राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाच्य
अंमलबजाणीकरीता उच्च व तंत्र शिक्षण
विभागाशी संबंधित संचालनालय / संस्थांन
प्रतिवर्षी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट
निश्चित करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(५३/२०१२)/व्यशि-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३१ मार्च, २०१२.

पहा:- १. शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१०/(१८४/१०)/व्यशि-५,
दिनांक ०६/११/२०१०.
२. शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१०/(१८४/१०)/व्यशि-५,
दिनांक ०८/१२/२०१०.
३. मा.मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत Core Group च्या दिनांक १२/०३/२०१२ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना-** मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. कौशल्य विकास कार्यक्रम ही मा.पंतप्रधानांची अतिशय महत्वाकांक्षी योजना (Flagship Scheme) असून सदरहू राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेने ५० कोटी कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार राज्यस्तरावर सन २०२२ पर्यंत ४.५ कोटी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

२. राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या धर्तीवर राज्यस्तरावर दिनांक १९ मे २०१० च्या शासन निर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली "शिखर परिषदेची" आणि मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीची" स्थापना करण्यात आली आहे. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६/९/२०१० रोजी कार्यकारी समितीच्या झालेल्या पहिल्या बैठकीतमध्ये राज्यस्तरावर ठरविण्यांत आलेले उपरोक्त उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत चर्चा झाली. त्यानुसार प्रतिवर्षी ४५ लाख एवढया मनुष्यबळाचे उद्दिष्ट संबंधित प्रशासकीय विभागांना निश्चित करुन देण्याचे निर्देश देण्यांत आले. त्यानुसार विभागाच्या संदर्भ क्रमांक १ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संचालनालयांना मनुष्यबळाचे उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात आले होते. दिनांक ०६/११/२०१० च्या शासन

निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टामध्ये बदल करुन संदर्भ क्रमांक २ च्या शुध्दीपत्रकानुसार सुधारीत मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले होते.

३. दिनांक १२/०३/२०१२ रोजी मा.मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमाच्या Core Group च्या झालेल्या बैठकीत राज्यस्तरावर प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने संबंधित प्रशासकीय विभागांना कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कुशल मनुष्यबळ निर्मितीचे वार्षिक उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात आले आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागास प्रतिवर्षी १० लाख कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे संदर्भ क्रमांक २ मधील दिनांक ०८/१२/२०१० च्या शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील संचालनालयांना निश्चित करुन देण्यात आलेल्या उद्दिष्टांमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-** उपरोक्त पार्श्वभूमीवर कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर प्रतिवर्षी ४५ लाख कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने, आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रतिवर्षी १० लाख कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विभागाच्या अधिपत्याखालील संचालनालयांना खालील प्रमाणे कुशल मनुष्यबळ निर्मितीचे वार्षिक उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचालनालयाचे नांव | संस्था / अभ्यासक्रम | लक्ष्य प्रतीवर्षी (लाखात) |
|---|---|---|---|
| १ | उच्च शिक्षण संचालनालय | कला, विज्ञान वाणिज्य, प्रौढ शिक्षण विद्यापीठ, इत्यादी.<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. | १.०० |
| २ | तंत्र शिक्षण संचालनालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ. | शासकीय व अशासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शासकीय व अशासकीय तंत्र निकेतन, HMCT, MKCL. | ४.६५ |
| ३ | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (व्यवसाय शिक्षण) | पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, द्विलक्षी अभ्यासक्रम, किमान कौशल्य व्यवसाय अभ्यासक्रम (MCVC) | १.८२ |
| ४ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ | अल्प कालावधीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम | १.५० |
| ५ | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (प्रशिक्षण) | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | १.७० |
| | **एकूण** | | **१०.६७** |

२. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित संचालनालयांनी त्यांना निश्चित करुन देण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

३. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२०३३११५०३३९३३९००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(किरण जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति

मा. मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उद्योग विभाग (लघु व मध्यम उद्योग) / कामगार विभाग / नियोजन विभाग / वित्त विभाग / शालेय शिक्षण विभाग / ग्राम विकास विभाग / अल्पसंख्यांक विकास विभाग / नगर विकास विभाग / आदिवासी विकास विभाग / सामाजिक न्याय विभाग / सार्वजनिक आरोग्य विभाग / महिला व बाल कल्याण विभाग / कृषि विभाग / सहकार व वस्त्रोद्योग विभाग.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, मुंबई.
सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परिक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
कार्यासन व्यशि-१,२,३,४.
निवड नस्ती (व्यशि-५) ५ प्रती.